**शपथेवर पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे श्री.पी.बी. मुंढे वकील यांचेकडूनः–**

**०४–** मला वाद मिळकतीचा क्रमांक माहीत नाही. वाद मिळकत ही २ एकर आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, २ एकर जमीन प्रतिवादी तुकाराम यास विक्री केलेली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, खरेदीखतानुसार ८२ गुंठे क्षेत्राचा मालकी व कब्जा प्रतिवादी यास दिलेला आहे. मला मराठी वाचता येत नाही. आम्हांला कमी क्षेत्र मिळाले आहे याकरीता हमीपत्र नि.क्र.२३ लिहीण्यात आलेले आहे. आम्हांला कमी क्षेत्र मिळालेले आहे ही बाब आम्हीं प्रतिवादीस खरेदीखत करुन देण्यापुर्वी सांगीतली नव्हती. हे म्हणणे बरोबर नाही की, प्रतिवादीस खरेदीखत करुन देण्यापुर्वी आमचा वाद मिळकतीच्या शेजा–यासोबत न्यायालयात वाद प्रलंबीत होता.

**०५–** हे म्हणणे बरोबर आहे की, आम्हीं त्यावेळेसच्या वादपत्रामध्ये असे नमुद केले होते की, सातबारापेक्षा कमी क्षेत्र आमच्या कब्जात आहे व ते कमी असलेले क्षेत्र शेजा–याच्या कब्जात आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, वाद प्रलंबीत असल्याची माहीती खरेदीखतामध्ये व नि.क्र.२३ मध्ये नमुद करण्यात आली नव्हती. हे म्हणणे बरोबर नाही की, नि.क्र.२३ मध्ये ९ आर ची किंमत रुपये १,६८,७५०/– ही खोटी नमुद केलेली आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, प्रतिवादी हा साधा व भोळा असल्यामूळे त्यास फसवूण नि.क्र.२३ लिहून घेतलेले आहे. आमच्या कब्जात ७३ गुंठे जमीन असताना फक्त ७३ गुंठयाचे खरेदीखत करुन न देण्याचे मी कोणतेही कारण सांगु शकत नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, प्रति हेक्टरी रुपये ६,४५,०००/– या दराने ९ आर ची किंमत रुपये ५८,०५०/– एवढी होते. हे म्हणणे बरोबर नाही की, हमीपत्र नि.क्र.२३ मधील मजकुर खोटा आहे. प्रतिवादीला ९ गुंठे जमीन काढून दिलेली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, आम्हांला ९ गुंठयाचा ताबा मिळाला नाही व आमचा दिवाणी दावा क्र.३४/२०१६ हा खारीज झालेला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, आम्हांला ९ गुंठे क्षेत्र मिळाले नसल्यामूळे आम्हीं प्रतिवादीस ९ गुंठे क्षेत्र दिलेले नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.03.27 16:23:17 +0530

**०६–** हे म्हणणे बरोबर नाही की, हमीपत्रामधील अटींचा भंग आम्हीं केलेला आहे व ताबा न देताच पैश्यांची मागणी करीत आहोत. हे म्हणणे बरोबर नाही की, नि.क्र.२६ वरील खोटी नोटीस पाठवलेली आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, नोटीस पाठवून व दावा दाखल करुन मी प्रतिवादीवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, आम्हीं स्वच्छ हेतुने प्रतिवादी सोबत व्यवहार न करता महत्वाच्या बाबी प्रतिवादी पासून लपवूण ठेवल्या. हे म्हणणे बरोबर नाही की, हा दावा दाखल करण्यासाठी कोणतेही कारण घडलेले नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, पहीला दावा प्रलंबीत असताना आम्हीं वाद मिळकतीचे खरेदीखत प्रतिवादीस करुन दिलेले आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, दावा दाखल करण्याचे कारण घडण्यापुर्वीच हा दावा दाखल करण्यात आलेला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, प्रतिवादीकडून काहीही मागण्याचा अधिकार मला नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, विनाकारण प्रतिवादीस मी दावा दाखल करुन परेशान केले आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, मी दाव्यात १८ टक्के दराने व्याज मागीतले आहे ते खोटे आहे.

**०७–** हे म्हणणे बरोबर नाही की, प्रतिवादीने नोटीसचे उत्तर देऊन रक्कम देणे लागत नसल्याबद्धल कळविले होते. हे म्हणणे बरोबर नाही की, मी खोटा दाखल केलेला आहे व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by YADAV GAJANAN BHANUDAS
Date: 2026.03.27 16:23:33 +0530

**( जी.बी. यादव )**,
दि.२७.०३.२०२६ दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
गंगाखेड.